## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. १०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०२/२०१७

**१) घरात शिरुन अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०२/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी ही घरी एकटीच हजर असतांना आरोपी हा मोटार सायकलने तिच्या घरी येवुन गृह प्रवेश करुन फिर्यादीचे हात पकडल्याने फिर्यादीने आरोपीचे हाताला झटका मारुन पडाली तेव्हा आरोपी हा मोटार सायकलने पडून जावुन कोंढा येथील मंदा भाजीपाले व अलका भाजीपाले यांचे घरी जावुन शिवीगाळ करुन हात पकडुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५४(ब),४५२,५०४ भादवी. सहकलम ८ बाल लैगिंक अत्याचार संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन दगडाने ठेचुन जिवानीशी ठार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०२/२०१७ चे १७.३० ते १३/०२/०१७ चे ०८.०० वा. दरम्यान. यातील दोनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचा मृतक मुलगा सारंग अजय शामकुवर वय १८ वर्ष, रा. लाखनी यास आपले मोटार सायकलवर सोबत नेवुन पैश्याचे लेनदेनवरुन दगडाने ठेचुन जिवानीशी ठार केले असे फिर्यादी अजय दुर्याधन शामकुवर वय ४३ वर्ष रा. रा. दत्त मंदीर जवळ लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३०२,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. नेवारे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) घराचा दाराचा कोडा तोडुन आत प्रवेश करुन सामानाची चोरी . :–**

दिंनाक १३/०२/२०१७ चे ८.३० ते १४.३० वा. दर. यातील फिर्यादी राजेन्द्र मुरारी पिसे वय ४५ वर्ष, रा. प्लॉट नं. ३ एमएससीबी कालोनी भंडारा व त्याची पत्नी घराला कुलूप लावुन डयुटीवर गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने समोरील दाराचा कोंडा तोडुन घराचे आत प्रवेश करुन बेडरुम मध्ये ठेवलेली गोदरेज आलमारी मधुन १ लॅकटॉप कॅम्पॉक कंपनीचा किंमती १५,०००/–रु. ५ जोड चांदीच्या पायपट्टया, चांदीचे बिछवे, चांदीचे दिवे, चांदीचे अंगरबत्ती स्टॅन्ड, चांदीचे ०९ सिक्के, चांदीचे श्रीकृष्ण व गणेश मुर्ती एकुण वजन ६० ग्रॅम, किंमती १०,०००/–रु. असा एकुण २५,०००/–रु. च्या माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो. स्टे. भंडारा येथे कलम ४५४,३८० भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**४) ट्रॅक्टर चालकांने स्कुल बसला धडक देवुन विदयार्थाना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०२/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी हितशे दादाराम जांभुळकर वय २९ वर्ष, रा. सुभाष वार्ड कोंढा हा आपली स्कुल बस क्र. एमएच ३६ एफ २८११ ने शाळेतील मुले घेवुन येत असतांना यातील ट्रॅक्टर चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन स्कुल बसला धडक दिल्याने गाडीतील १२ ते १५ विदयार्थी जखमी झाले. व गाडीचे नुकसान केल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७,४२७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १३/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, कारधा, सिहोरा, गोबरवाही, व मोहाडी येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ६ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५३ लिटर हातभट्टी दारु किंमती ३,९३०/–रु. तसेच जुगारातुन किंमती १७९५/–रु. असा एकुण किंमती ५,७२५/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९०४९००३३७२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.